हिंदकेसरी मारुती माने या ख्यातनाम आंतरराष्ट्रीय कुस्तीपट्टूचे स्मारक कवठेपिरान, ता.मिरज, जि.सांगली येथे उभारण्याबाबत - निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुमाप्र-२६१७/प्र.क्र.१९७/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१८.

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-स्मारक-३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ दिनांक ०२ फेब्रुवारी, २००५.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक क्रीडायो-२४१०/प्र.क्र.३७१/१०/ क्रीयुसे-१, दिनांक २५ जुलै, २०११.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक क्रीडायो-२४१०/प्र.क्र.३७१/१०/ क्रीयुसे-१, दिनांक २५ ऑगस्ट, २०१४.
४) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.हिंदकेसरीमारुतीमाने/बांधकाम/निधी/ २०१७-१८/का.६/२५२, दिनांक १६ जानेवारी, २०१८.

प्रस्तावना :-

जकार्तावीर हिंदकेसरी मारूती माने या ख्यातनाम कुस्तीपटुचे त्यांच्या मुळ गावी कवठेपिरान, ता.मिरज, जि.सांगली येथे स्मारक उभारण्यासाठी संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार श्री.प्रमोद चौगुले यांची आर्कीटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.प्रमोद चौगुले, आर्कीटेक्ट यांनी नियोजित स्मारकाच्या बांधकामाचा आराखडा तयार करून समितीस सादर केला होता. सदर बांधकामाच्या रू.४,९४,९९,३८४/- (अक्षरी रूपये चार कोटी चौऱ्यान्नव लाख नव्यान्नव हजार तीनशे चौऱ्याऐंशी फक्त) च्या आराखडयास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांनी मान्यता दिली आहे. सदर स्मारकाच्या बांधकामाकरिता येणा-या रू.४,९०,२७,९६२/- (अक्षरी रूपये चार कोटी नव्वद लाख सत्तावीस हजार नऊशे बासष्ठ फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या बांधकामास संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

क्रीडापटुंच्या स्मारकाची उभारणी या योजनांतर्गत योजनेकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरिता पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतूदीपैकी रु.२०४.०० लक्ष (रुपये दोन कोटी चार लाख फक्त) एवढी तरतूद हिंदकेसरी मारुती माने स्मारक बांधकामासाठी वितरीत करण्यास व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ मध्ये क्रीडापटुंच्या स्मारकाची उभारणी याकरीता उपलब्ध झालेल्या रु.२५५.०० लक्ष एवढया तरतुदी मधून सदर निधी वितरीत करण्यात यावा.

I. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

III. उपरोक्त स्मारकाची उभारणी करताना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वे व त्याचप्रमाणे या विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयातील समितीच्या कार्यकक्षेनुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

३. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक ई-४, प्रधान लेखाशीर्ष ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती या वरील भांडवली खर्च ०३, क्रीडा व युवक सेवा क्रीडा प्रेक्षागृह, ८०० इतर प्रेक्षागृह, राज्य योजनांतर्गत योजना (००)(०२) क्रीडापटुंच्या स्मारकांची उभारणी (४२०२ ६२५५), ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखालील या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

४ वित्त विभाग दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक २४.०७.२०१५ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी / लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३/१४७१, दिनांक ०५.०२.२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६८/व्यय-५, दिनांक ०६.०३.२०१८ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१७१२०६८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.28 10:46:52 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. जिल्हाधिकारी, सांगली
८. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
९. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१०. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर. (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. जिल्हा क्रीडा अधिकारी, सांगली (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. जिल्हा कोषाधिकारी, सांगली / पुणे (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-१).